दैनिक

बीड । बुधवार
२५.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २५८
किंमत : ३ रू. पाने : ४

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24

कुणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही

बीडच्या पालकमंत्रिपदावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पष्ट बोलले

बीड, (प्रतिनिधी):– जिल्ह्यात पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये अंतर्गत मतभेद समोर आले आहेत. मुंडे–बहीण भावांना कॅबिनेट मंत्रीपद मिळाल्यानंतर बीडचा पालकमंत्री कोण अशी चर्चा होत असतानाच भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मोठं वक्तव्य केले आहे. मागील पालकमंत्र्यांनी पाच वर्षासाठी मंत्रीपद आणि पालकमंत्री पद भाड्याने दिले होते, असं वक्तव्य केलं. त्यामुळे बीड मधील पालकमंत्री पदाचा पेच वाढला आहे.

मुंडेंचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळाले. सहापैकी पाच जागेवर महायुतीने विजय मिळवला. यात भाजपमधून कॅबिनेट मंत्री म्हणून पंकजा मुंडे यांची वर्णी लागली तर राष्ट्रवादी मधून धनंजय मुंडे हे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री आहेत. शपथविधीनंतर खातेवाटप ही झाली आता पालकमंत्री कोण यावरून चर्चा होत असतानाच. बीड जिल्ह्यात महायुतीमध्ये मात्र सर्व काही अलबेल आहे अशी परिस्थिती नाही. भाजप आमदार सुरेश धस यांनी मागील पालकमंत्री यांनी मंत्रीपद आणि पालकमंत्री पद भाड्याने दिले होते असा घणाघात करत धनंजय मुंडे यांच्यावर टीकास्त्र डागले. तसेच बीडच्या पालकमंत्री पद मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी घ्यावे अशी मागणी देखील सुरेश धस यांनी केली. मृत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने बीड जिल्हा धूमसत असतानाच मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांचे नाव या संपूर्ण प्रकारात चर्चिले जात आहे तर त्यांच्यावर खंडणीचा गुन्हा देखील दाखल झाला आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्वच विरोधी आणि सत्ताधारी आमदारांनी कायदा सुव्यवस्थेवर बोट ▶▶पान २ वर

पालकमंत्री म्हणून कोणाच्या गळ्यात माळ टाकणार

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी, सामाजिक अस्थिरता, अपहरण खून हत्या, दंगली खंडणी आणि बोगसगिरीला आळा घालून जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान देणारा पालकमंत्री जिल्ह्याला मिळावा अशी अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली जात आहे.. तर जिल्ह्यातील सामाजिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री पालकमंत्री म्हणून कोणाच्या गळ्यात माळ टाकणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

परळी तालुक्यातील मुकादमाने

ऊसतोड मजुराचा दगडाने ठेचून केला खून

परळी, (प्रतिनिधी):–तालुक्यातील अस्वलंबा येथील ऊसतोड मजूर विकास बाळासाहेब जोगदंड (वय २८) हा झोपेत असताना त्यांच्याच गावचा मुकादम श्रीकृष्ण विठ्ठल ढाकणे (वय ४७) याने डोक्यात दगड घालून त्याचा खून केल्याची घटना कर्नाटक राज्यात घडली.घटप्रभा पोलिस व घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार मुकादम श्रीकृष्ण ढाकणे हा आजारी असल्याने त्यास विकास जोगदंड याने उपचारासाठी दवाखान्यात आणले होते. दवाखान्यात दाखल करून जोगदंड दवाखान्याबाहेर उभारण्यात आलेल्या जगद्गुरू गुरु सिद्धेश्वर मूर्ती जवळ रात्री साडेअकराच्या सुमारास झोपला होता. रात्री श्रीकृष्ण ढाकणे हा दवाखान्या बाहेर आला आणि काही कळायच्या आत विकास जोगदंडच्या डोक्यात चाळीस किलो पेक्षा मोठा दगड घातला. त्यानंतर विकासच्या छातीवर बसून दगडाने तोंड, डोके ठेचू लागला. हे पाहून दवाखान्याच्या सुरक्षा रक्षकाने धाव घेत ढाकणे याला पकडले आणि घटप्रभा पोलिसांना माहिती दिली. ढाकणे याला पोलिसांच्या ताब्यात दिले. मृताचे वडील बालासाहेब मारुती जोगदंड यांनी घटप्रभा पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिस निरीक्षक एच. डी. मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक एस. आर. कणवी अधिक तपास करीत आहेत.

मागील काळात बीडचे मंत्रिपद अन् पालकमंत्रीपद भाड्याने दिले होते

सुरेश धसांचा धनंजय मुंडेंवर हल्लाबोल,परळी तालुक्यात अराजकता

बीड, (प्रतिनिधी): – बीड जिल्ह्याचे मागील पालकमंत्री यांनी त्यांच्या मंत्रिपदासह पालकमंत्रीपद भाड्याने दिले होते. देवेंद्र फडणवीस किंवा अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री स्वीकारायला हवे, अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे. दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरणी आरोपींना १५ दिवसांचा पीसीआर मिळाला आहे. यामुळे सीआयडी तपास करण्याची संधी मिळणार आहे. काल रात्रीच या प्रकरणी एसआटीवर मुख्यमंत्र्यांची साईन झाली आहे, अशी माहिती भाजप आमदार सुरेश धस यांनी दिली आहे. सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, आयजीच्या मार्गदर्शानाखाली या घटनेचा तपास होणार असून ज्युडिशिअल तपासही होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हे प्रकरण मनावर घेतले आहे. हा प्रकार महाराष्ट्रभरात लोकांनी निषेध वर्तवला आहे. सुरेश धस म्हणाले की, सीएम फडणवीसांच्या सभागृहातील ▶▶पान २ वर

कोणाचा पण बाप येऊ द्या, ते मॅटर मी दबू देत नसतो

बीड प्रकरणावरुन जरांगेंचा इशारा

जालना, (वृत्तसेवा) :– बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यभरात संताप व्यक्त होत असून राजकीय वातावरणही तापलं आहे. बीडमधील नेतेमंडळी व नव्याने मंत्री झालेले मुंडे गप्प का आहेत, असा सवाल विचारला जात आहे. दुसरीकडे मराठा क्रांती मोर्चा व बीडमधील सर्वपक्षीय नेते एकत्र आले असून २८ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांच्या हत्येतील प्रमुख आरोपींना अटक करण्याची मागणी करत जनता रस्त्यावर उतरणार आहे. मराठा आंदोलक आणि उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनीही संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर देशमुख कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. आता, पुन्हा एकदा ते मस्साजोगला जाणार आहेत. बीड जिल्ह्यात २८ तारखेला जनतेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मोर्चातही ते सहभागी होणार असून बीड जिल्ह्यातील जनतेला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचं आवाहनही जरांगे पाटील यांनी केलं आहे. त्यामुळे, आता २८ डिसेंबरच्या आंदोलनाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. कोणाचाही पण बाप येऊ द्या ते मॅटर मी दबू देत नाही, कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी हटणार नाही, अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. सरकारला एकमेकांना मोबाईलचे फोन केलेले तपासायला एवढे दिवस लागतात का? एकदा बीड जिल्ह्यातील जनतेनं ▶▶पान २ वर

पंकजा मुंडे मस्साजोग प्रकरणावर गप्प का?-अंजली दमानिया यांचा सवाल

धनंजय मुंडे–वाल्मीक कराडच्या संबंधांचा ७/१२ केला जाहीर

मुंबई, (वृत्तसेवा):–बीडच्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडावर राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे गप्प का आहेत? असा तिखट सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे व प्रस्तुत प्रकरणातील कथित आरोपी वाल्मीक कराड यांची एकत्र जमीन असल्याचा आरोप करत त्याचा ७/१२ ही जाहीर केला आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचा हात असल्याचा आरोप होत आहे. विरोधकांनी यासंबंधी टीकेची झोड उठवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी आयजीस्तरीय एसआयटी व न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा केली. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी पंकजा मुंडे यांनी यासंबंधी साधलेल्या मौनावर टीका केली आहे. अंजली दमानिया म्हणाल्या, संतोष देशमुख यांची लहान मुलगी रडताना दिसते तव्हा आपण नागरीक म्हणून काय करतो याची मला खंत वाटते. चांगल्या लोकांनी घरात बसून राहिले तर अशी दहशत निर्माण करणाऱ्या लोकांविरोधात कुणीही बोलणार नाही. त्यामुळे मी २८ तारखेला बीडला जाण्याचा निर्णय घेतला आहे. मी तिथे जाऊन यांच्या काळ्या कारनाम्यांविरोधात आवाज उठवेन. वाल्मीक कराडला अटक होईपर्यंत ठिय्या आंदोलन करून लढा उभारणे हे मी माझे कर्तव्य समजते. अंजली दमानिया पुढे म्हणाल्या, मी पंकजा मुंडे यांना तुम्ही गप्प का? मेसेज पाठवण्याचा प्रयत्न केला. पंकजा बीडच्या मंत्री आहेत. त्या भगवान गडावरू ज्या व्यक्तीविरोधात बोलल्या होत्या, त्या व्यक्तीचा खंडणीच्या गुन्ह्यात स्पष्ट आहे. याशिवाय त्याचा संतोष देशमुख हत्याकांडात हात आहे की नाही यावर त्या चकार शब्दही बोलत नाहीत. बीडच्या जनतेला त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. त्यांनी यावर स्पष्ट

भूमिका घेण्याची गरज होती. संतोष देशमुख यांच्या शवविच्छेदान ▶▶पान २ वर

लाडक्या बहिणींना २१०० रुपये नेमके कधी मिळणार?

मंत्री आदिती तटकरेंनी थेट सांगून टाकलं; गोंधळ केला दूर!

मुंबई, (वृत्तसेवा):– लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना डिसेंबर महिन्याचे १५०० रुपये देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्य सरकारने सांगितल्यानुसार डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत सर्व पात्र महिलांना १५०० रुपये मिळतील. दरम्यान, निवडणुकीआधी महायुतीने आम्ही सत्तेत आल्यास १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देऊ असे आश्वासन दिले होते. त्यामुळेच डिसेंबर महिन्यात लाडक्या बहिणींना नेमका किती निधी मिळणार, असे विचारले जात होते. याबाबतच महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी नेमकी माहिती सांगितली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या पहिल्या पत्रकार परिषदेत लाडकी बहीण योजनेविषयीची सरकारची भूमिका स्पष्ट केलेली आहे. अर्थसंकल्पीय बजेट जेव्हा पुढच्या वर्षी मांडण्यात येईल, त्या वेळेला २१०० रुपये देण्यासंदर्भातला विचार सकारात्मक पद्धतीने करण्यात येणार आहे. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये स्थगित केलेला लाभ होता तो आता वितरित करण्यात येत आहे. त्याची सुरुवात केलेली आहे. नोव्हेंबर महिन्यातील लाभ महिलांना मिळालेला आहे. डिसेंबर महिन्यातील लाभाच्या वितरणाची सुरुवात आता केलेली आहे. डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत पात्र महिलांच्या बँक खात्यात सन्मान निधी पोहचलेला असेल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले. म्हणजेच नवीन लाभार्थींच्या नोंदणीच्या नोंदणीची प्रक्रिया अनेक ठिकाणी रखडल्याचं दिसतंय. यावरही आदिती तटकरे यांनी यांनी एबीपी माझाला माहिती दिली. ''रजिस्ट्रेशनची शेवटची मुदत १५ ऑक्टोबर होती. १५ ऑक्टोबरपर्यंत अडीच कोटी महिलांनी नोंद केलेली आहे. अद्यापपर्यंत पुन्हा रजिस्ट्रेशनला सुरुवात करण्यासंदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. सध्यातरी नोंदणी केलेल्या महिला, पात्र महिलांपर्यंत सन्माननिधी पोहोचवण्याची प्रक्रिया सध्या चालू आहे. ज्या महिलांचे अर्ज मान्य झालेले आहेत. पण आधार सिंडिंगमुळे ज्या महिलांना लाभ मिळालेला नाही, त्या महिलांना कसा लाभ मिळेल याकडे सध्या लक्ष केंद्रित केलेले आहे. आता पुन्हा एकदा रजिस्ट्रेशन सुरु करण्याचा निर्णय सध्यातरी झालेला नाही,'' अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली. लाभार्थी ▶▶पान २ वर

भुजबळांना डावलून अजितदादांनी घेतला २००९चा बदला?

मुंबई, (वृत्तसेवा):–मंत्रिमंडळ विस्तारात डच्चू दिल्यानं राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ नाराज झाले आहेत. गेल्या आठवड्याभरापासून ते सातत्यानं त्यांची नाराजी बोलून दाखवत आहेत. पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर भुजबळ उघड टीका करत आहेत. काल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत ४० मिनिटं चर्चा केली. भुजबळ यांना डावलून अजित पवारांनी २००९ मध्ये घडलेल्या घटनेचा बदला घेतल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. त्यावेळी घडलेला घटनाक्रम माजी आमदार विलास लांडे यांनी कथन केला. '२००९ मध्ये काँग्रेसचे अशोक चव्हाण मुख्यमंत्री झाले. ▶▶पान २ वर

कोणते आंबेडकर?

लोकसभा निवडणुकीत 'संविधाना'चा फटका बसल्यापासून भाजपने राज्यघटना आणि त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपलेसे करण्याचा चंगच बांधलेला दिसतो. हे राजकीयदृष्ट्या स्तुत्यच. त्यामुळे संसदेच्या या वर्षीच्या शेवटच्या अधिवेशनात संविधान, घटना आदी मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. अलीकडे सांसदीय चर्चेत विद्वान, अभ्यासकांस आकर्षक वाटेल असे फारच काही क्वचित असते. सगळा आरोप-प्रत्यारोपांचा उथळ खेळ. त्यातूनच 'आंबेडकर, आंबेडकर' करण्याची हल्ली कशी 'फॅशन' आहे असे काही बोलले गेले. ते सध्याच्या काळास साजेसेच म्हणायचे. आरोप-प्रत्यारोपाचा खेळ शून्य बौद्धिक संपदेवरही मोठ्या जोमाने खेळता येतो आणि फुप्फुसांच्या ताकदीवर जिंकताही येतो. जितकी जास्त फुप्फुसे तितकी विजयाची शक्यता अधिक. त्यामुळे संसदेत जे काही झाले ते तेथेच सोडून त्या निमित्ताने डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक, धार्मिक आणि अर्थातच राजकीय मतांची किंचित उजळणी आवश्यक ठरते. सध्याचे राजकारण हे अशी उजळणी आवश्यक ठरण्याचे दुसरे कारण. या राजकारणात 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या तत्त्वाप्रमाणे 'आपल्या टीकाकारावर टीका करणारा तो आपला समर्थक' असे मानण्याचा प्रयत्न मोठ्या जोमाने होताना दिसतो. त्यातून सरदार पटेल यांस नेहरू- टीकाकार ठरवून 'आपले' म्हणण्याचा प्रयत्न जसा दिसतो तसा सुभाषचंद्र बोस हे तर 'आमचेच' अशी द्वाही फिरवण्याचा उत्साहही दिसतो. तो दर्शवणाऱ्यांस सरदार पटेल यांची रा.स्व. संघाविषयीची मते माहीत असतात आणि नेताजी बोस यांच्यासाठी पं नेहरू, गांधी हे किती आदरस्थानी होते हेही पूर्ण माहीत असते. या मालिकेत आता डॉ. आंबेडकर यांच्यावर 'आपलेकरण' प्रयत्न अनुभवण्याची वेळ आलेली दिसते. ते ठीक. बाबासाहेबांनी काँग्रेसवर प्रसंगी टीका केली हे खरे. काँग्रेसकडून त्यांना निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला, हेही खरे. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात मतभेद होते हे खरे आणि गांधींचा 'हरिजन' हा शब्द तर त्यांना बिलकूल अमान्य होता हे तर खरेच खरे. पण याचा अर्थ डॉ. आंबेडकर हे सांस्कृतिक अर्थाने हिंदू धर्म आणि परंपरा यांचे समर्थक होते काय? त्यांचा बौद्धिक पाठिंबा हिंदुत्ववादी विचारांस होता काय? सावरकर यांच्यासारख्या 'सुधारणावादी' हिंदुत्ववादी नेत्यांचा पुरस्कार बाबासाहेबांनी कधी केला होता काय? अशा काही प्रश्नांची उत्तरे या निमित्ताने शोधता येतील. प्रचाराचा भाग, निकड आणि आदर्श नायकांची एका बाजूस असलेली वानवा म्हणून कर्तृत्ववान बुद्धिवंताच्या 'आपलेकरणाचे' प्रयत्न जोमाने होतात. बौद्धिकदृष्ट्या कुपोषितांची संख्या प्रचंड वेगाने वाढत असल्याने ते गोड मानून घेतले जातात आणि त्यामुळे इतिहासाचे विद्रूपीकरण होते. ते टाळण्यासाठी सदरहू व्यक्तीचे मूळ लिखाण वाचणे आणि ते उद्धृत करणे उत्तम. पहिला मुद्दा डॉ. आंबेडकर आणि हिंदू धर्म. त्याचे उत्तर डॉ. बाबासाहेबांनीच नि:संदिग्धपणे दिलेले आहे. संदर्भ नाशिकजवळील येवला येथे १३ ऑक्टोबर १९३५ या दिवशी बाबासाहेबांनी केलेले भाषण. त्याचे महत्त्व त्या वेळी माध्यमांस लगेच कळले नाही. कारण त्या वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर मुसोलिनीच्या फौजा इथियोपियाचा घास घेऊ पाहात होत्या आणि भारतात अ. भा. काँग्रेस समितीच्या आगामी अधिवेशनात 'संपूर्ण स्वराज्या'ची मागणी केली जाणार किंवा काय याबाबत उत्सुकता होती. त्यामुळे बाबासाहेबांच्या भाषणाकडे प्रारंभी दुर्लक्ष झाले. ''हिंदू धर्म ज्यांस अस्पृश्य मानतो त्या समाजात माझा जन्म झाला, हे माझे दुर्दैव. पण ते माझ्या हाती नव्हते. तथापि मी हिंदू म्हणून जन्मास आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही, हे निश्चित'' असा दृढनिश्चय बाबासाहेबांनी या भाषणात व्यक्त केला. सुरुवातीला रामभाऊ तटणीस यांच्या 'विविधवृत्त' साप्ताहिकाने तेवढे हे भाषण छापले आणि नंतर 'द बॉम्बे क्रॉनिकल'ने 'आंबेडकर थ्रोज बॉम्बशेल' अशा मथळ्याने ते छापल्यानंतर सर्वत्र खळबळ उडाली. तथापि बाबासाहेब ठाम होते आणि हिंदू धर्माविषयीचे त्यांचे मत कधीही बदलले नाही. त्याआधी १५ मार्च १९२९ या दिवशी 'बहिष्कृत भारत'च्या अंकात बाबासाहेबांनी 'हिंदू धर्मास नोटीस' या शीर्षकाच्या स्वलिखित संपादकीयाद्वारे आपली दिशा स्पष्ट केली होती. त्या वेळी हिंदू धर्मातील स्वत:स सुधारणावादी म्हणवून घेणारे आपण किती सहिष्णु आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न करू लागले होते आणि अस्पृश्यता पाळू नये इत्यादी दावे करू लागले होते. सदर संपादकीयातून बाबासाहेबांनी या सर्वांचा समाचार घेताना ''बहिष्कृत वर्गास हिंदू धर्माविषयी आपलेपणा का वाटावा'' असे विचारत 'शेळ्यांना लांडग्यांविषयी आपलेपणा वाटणे कधी संभवनीय आहे काय' असा जळजळीत प्रश्न उपस्थित केला. ''हिंदू समाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही'' हे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. ते मांडताना बाबासाहेबांनी चोख संस्कृत दाखले दिले आणि ''तत्त्वज्ञान काय चाटावयाचे आहे'' असे विचारण्यास कमी केले नाही. हा इतिहास ज्यांस माहीत नाही, ते बाबासाहेबांचे आणि सावरकरांचे संबंध किती सौहार्दाचे होते, सावरकरांविषयी बाबासाहेबांस किती आदर होता इत्यादी दावे करतात. तो करणारे बाबासाहेबांनी सावरकरांस लिहिलेल्या एका पत्राचा आधार घेतात. रत्नागिरी येथील मंदिर अस्पृश्यांस खुले करण्याच्या समारंभासाठी सावरकरांनी डॉ. बाबासाहेबांस निमंत्रित केले होते. त्याबद्दल बाबासाहेबांनी या पत्रात सावरकरांचे आभार मानले, ते करीत असलेल्या सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नांचे कौतुक केले परंतु सावरकरांच्या याबाबतच्या दृष्टिकोनावर आपले आक्षेपही नोंदवले. बाबासाहेब या पत्रात लिहितात: ''केवळ अस्पृश्यता दूर करणे पुरेसे नाही. चातुर्वर्ण्य व्यवस्थाच निकाली काढायला हवी तुमच्या सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नांविषयी आदर आहे; पण त्या प्रयत्नांबाबतची तुमची परिभाषा चातुर्वर्ण्य निदर्शक (चातुर्वण्य जार्गन) आहे'' असे नमूद करून बाबासाहेबांनी हे निमंत्रण नाकारले, हे लक्षात घ्यायला हवे. म्हणजे अस्पृश्यांस केवळ मंदिरात प्रवेश करू देणे केवळ प्रतीकात्मक ठरेल, ते पुरेसे नसून चातुर्वर्ण्य व्यवस्था समूळ नष्ट करायला हवी हे बाबासाहेब स्पष्टपणे नमूद करतात. याच मुद्द्यावर हिंदू महासभा आणि नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे विचारही बाबासाहेबांस अमान्य होते. 'सामाजिक समरसता' वगैरे शब्दच्छल वरवरचा; त्या खालील जातव्यवस्था आणि जातीची मानसिकता तशीच, अशी त्यांची धारणा होती. याबाबत बाबासाहेबांची मते किती तीव्र असावीत? ''अस्पृश्यांनी राष्ट्रद्रोह केला याची जबाबदारी मानवद्रोह करणाऱ्या धर्मपरंपेवर आहे'' असे म्हणण्यास बाबासाहेब अजिबात कचरत नाहीत. ही बाब अत्यंत महत्त्वाची. याचे कारण हिंदू महासभेचे मदन मोहन मालवीय वा अन्य हे सुधारणावादी होते असे अलीकडे दाखवण्याची 'फॅशन' असली तरी प्रत्यक्षात ते तसे खरोखरच होते काय? काँग्रेसच्या अस्पृश्यताविषयक उपसमितीचे तत्कालीन प्रमुख असलेले मालवीय अस्पृश्यतेविषयीचा ठराव मांडताना म्हणाले : ''तुम्ही अस्पृश्यांच्या मुली करा वा त्यांना आपल्या मुली द्या असे आमचे मुळीच म्हणणे नाही तुमच्या घरात अस्पृश्यांना घेऊन जा, असे आम्ही म्हणत नाही प्रत्येकाने आपल्या जातीचा अभिमान सोडावा असेही आम्ही म्हणत नाही. आमचे म्हणणे इतकेच की अस्पृश्यांना समान हक्क द्या''. म्हणजे हिंदुत्ववाद्यांतील कथित सुधारणावादी जात व्यवस्थेची चौकट शाबूत ठेवून अस्पृश्यांना बरोबरीचे अधिकार ''देऊ'' इच्छित होते. त्यात आम्ही कोणास काही देत असल्याची मोठेपणाची अंगभूत, जातीभूत भावना होती. तर बाबासाहेबांचे मत ही चौकट पूर्णच मोडून टाकणे आवश्यक असे होते. बाबासाहेबांस 'आपले' ठरवण्याच्या अलीकडच्या प्रयत्नांत हे वास्तव दडवले जाते. ते करणाऱ्यांची राजकीय असाहाय्यता लक्षात घेतली तरी वास्तवाकडे लक्ष वेधणे आवश्यक. याआधी सावरकरांचा निवडक उदोउदो करणाऱ्यांचा कावा उघडकीस आणताना 'लोकसत्ता'ने 'नक्की कोणते सावरकर?' असा प्रश्न १७ ऑक्टोबर २०१९ या दिवशीच्या संपादकीयातून विचारला होता. त्याच धर्तीवर डॉ. आंबेडकर यांस सरदार पटेल, नेताजी बोस यांच्याप्रमाणे 'आपले' ठरवण्याचे प्रयत्न होत असताना संबंधितांस नक्की 'कोणते आंबेडकर' असे विचारणे उचित ठरते. फक्त घटनाकार म्हणून डोक्यावर घ्यायचे आणि त्यांचे अन्य विचार चातुर्याने पायदळी तुडवायचे ही खरी आजची 'फॅशन'. ती त्यागणे गरजेचे.

रामटेकवर गेला, तो अडचणीत आला

इतिहास साक्षीला, तरीही मुंडेंनी मागून घेतला बंगला, कारण काय?

मुंबई, (वृत्तसेवा):-भारतीय जनता पक्षाच्या नेत्रदीपक विजयात मोलाची भूमिका बजावणाऱ्या प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना महसूलमंत्रिपद मिळालं. महत्त्वाचं आणि वजनदार पद मिळाल्यानं बावनकुळे यांचे कार्यकर्ते सुखावले. पण काल मंत्र्यांना बंगल्यांचं वाटप झालं आणि बावनकुळेंचे कार्यकर्ते धास्तावले. बावनकुळेंना रामटेक बंगला मिळाल्यानं कार्यकर्ते, निकटवर्तीय चिंतेत पडले. पण पंकजा मुंडेंनी रामटेक बंगला मागितल्यानं बावनकुळेंच्या कार्यकर्त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. महसूल मंत्री झालेल्या बावनकुळेंना रामटेक बंगला देण्यात आला होता. रामटेकचा इतिहास पाहता बावनकुळेंच्या कार्यकर्त्यांना धास्ती वाटू लागली. पण पंकजा मुंडेंनी त्यांना मिळालेला पर्णकुटी बंगला सोडून रामटेकची मागणी केली. रामटेक बंगला अतिशय प्रशस्त आहे. मलबार हिल परिसरात असलेल्या बंगल्यातून समुद्र दिसतो. पंकजा मुंडेंना फडणवीस सरकारमध्ये पर्यावरण खातं मिळालं आहे. रामटेक बंगला महत्त्वाच्या मंत्र्यांना दिला जातो. त्यामुळेच तो यंदा बावनकुळेंना देण्यात आला. या बंगल्यात वास्तव्यात राहिलेले अनेक मंत्री वादात सापडले आहेत. काही मंत्र्यांना राजीनामे द्यावे लागले आहेत. नेमका हाच बंगला बावनकुळेंना मिळाल्यानं त्यांचे कार्यकर्ते धास्तावले होते. पण आता हा बंगला पंकजा यांनी मागून घेतल्यानं बावनकुळेंच्या कार्यकर्त्यांचा जीव भांड्यात पडला. राज्यात १९९५ मध्ये शिवसेना, भाजप युतीचं सरकार आलं. तेव्हा भाजपचे गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री झाले. त्यांच्याकडे गृहखातं होतं. त्यावेळी त्यांचा मुक्काम रामटेकमध्ये होता. त्यामुळेच आता त्यांच्या कन्या पंकजा मुंडेंनी रामटेक बंगला मागून घेतल्याची चर्चा आहे. याआधी रामटेकवर शरद पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेते राहून गेले आहेत. १९९९ मध्ये राज्यात पहिल्यांदा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचं सरकार आलं, तेव्हा छगन भुजबळ यांना रामटेक बंगला मिळाला होता. त्यावेळी तेलगी प्रकरण गाजलं. स्टॅम्प पेपर घोटाळ्यामुळे भुजबळ यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर २०१४ मध्ये युती सरकारच्या काळात भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंना हा बंगला मिळाला. त्यांना जमीन खरेदी घोटाळा प्रकरणात राजीनामा द्यावा लागला. २०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडी सरकार आलं. तेव्हा अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री झालेल्या भुजबळांना रामटेक बंगला मिळाला. पण अडीच वर्षांत सरकार कोसळलं आणि भुजबळांना बंगला सोडावा लागला. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात दीपक केसरकर यांना शालेय शिक्षण खातं मिळालं. पण महायुती सरकार पुन्हा सत्तेत आलं तरीही केसरकर यांना पुन्हा मंत्रिपद मिळालं नाही. त्यामुळे त्यांना बंगला सोडावा लागला.

मंदिरात भक्ताने दिलेला पैसा ताब्यात घेण्याचा सरकारला अधिकारच काय?

महंत रामगिरी महाराज यांचा सवाल

शिर्डी, (वृत्तसेवा):-हिंदूंच्या ज्या मंदिरात उत्पन्न दिसायला लागते ते मंदिर सरकार ताब्यात घेते. शेकडो हजारो कोटींचे व्यवहार होणारी इतर धर्मियांची मंदिरे सरकारच्या ताब्यात नाहीत. त्यामुळे हिंदू मंदिरात भक्ताने दिलेला पैसा सरकारने ताब्यात घेण्याचा अधिकारच काय? असा सवाल महंत रामगिरी महाराज यांनी उपस्थित केला आहे. शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय मंदिर न्यास परिषदेत बोलताना त्यांनी हा सवाल केला आहे. शिर्डीत महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आज मंगळवार आणि उद्या असे दोन दिवस ही परिषद संपन्न होणार आहे. राज्यभरातील एक हजाराहून अधिक मंदिर प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील जिवदानी देवी संस्था, ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, साई पालखी निवारा आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे, मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे, वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यावर उपाय, मंदिरे आणि तिर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर या परिषेद होणार चर्चा होणार आहे.

महायुतीत भाजपाच मोठा भाऊ!

मुंबई, (वृत्तसेवा):- महाराष्ट्रात महायुतीचं सरकार आलं आहे. तसंच २१ डिसेंबरला खातेवाटपही पार पडलं आहे. मागच्या सरकारपेक्षा या सरकारमध्ये बराच फरक आहे. कारण भाजपा मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. काही सूक्ष्म बदल करत भाजपाने मोठा भाऊ असल्याचा वरचष्मा कायम ठेवला आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांच्यातली स्पर्धा आहेच. दुसरीकडे भाजपाने मात्र आपलं वर्चस्व कायम ठेवल्याचं दिसून येतं आहे यात काहीच शंका नाही. २३ नोव्हेंबरला जो निकाल लागला त्यात भाजपाचे १३२ आमदार निवडून आले. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ५७ जागा मिळाल्या, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या. त्यामुळे भाजपाकडे सर्वाधिक मंत्रिपदं आणि मुख्यमंत्री हे महत्त्वाचं पद राहणार हे सरळ होतं. भाजपाकडे २० मंत्रिपदं मिळाली आहेत तर राष्ट्रवादी आणि शिवसेना १२ आणि १० पदं मिळाली आहेत. अशात मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतरही कठीण होतं ते खातेवाटपाचं काम. ज्यासाठी जवळपास १५ दिवसांचा कालावधी लागला. भाजपाच्या एका वरच्या फळीतल्या नेत्यांच्या सूत्रांपैकी एकाने इंडियन एक्स्प्रेला सांगितलं की एकनाथ शिंदे एक पायरी खाली उतरत उपमुख्यमंत्री हे पद घ्यायला तयार झाले. पण भाजपावर त्यांनी दबाव टाकून पाहिला होता. तर दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी महत्त्वाच्या खात्यांसाठी जास्त आग्रही होती हे कळलं. एकनाथ शिंदे यांना कळून चुकलं होतं की त्यांना मुख्यमंत्री होता येणार नाही त्यामुळे ते गृहमंत्री पदासाठी आग्रही होते. मात्र भाजपाने ते पदही आपल्याकडेच ठेवलं. त्यानंतर नगर विकास, महसूल आणि पाटबंधारे विभाग ही खाती मागितली गेली.

बीडमध्ये पोलिसांची ॲक्शन सुरू

हवेत गोळीबार करणाऱ्यावर गुन्हा

बीड, (प्रतिनिधी) :-हवेत गोळीबार करून व्हिडिओ काढणाऱ्या धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यावर अखेर बीडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एबीपी माझाने याबाबतचे व्हिडिओ दाखवल्यानंतर आणि सोशल मीडियातून हे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अखेर पोलिसांनी कारवाई करत संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता कैलास फड याने हवेत गोळीबार केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमातून समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी ट्विट करत हा व्हिडिओ शेअर करत बीडमधील गुंडागर्दी व दहशतीवरुन प्रश्न उपस्थित केले होते. या व्हिडिओच्या आधारे पोलिसांनी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. विशेष म्हणजे, बीडचे नवे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हेही ॲक्शन मोडमध्ये असून लवकरच संतोष देशमुख प्रकरणातील उर्वरीत आरोपीला अटक करणार असल्याचं त्यांनी म्हटलंय. बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या केल्यानंतर आरोपींच्या अटकेसाठी राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तसेच, या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील दहशत आणि बीडमधील गुंडागर्दीचा मुद्दा समोर आला असून बीडचा बिहार होत असल्याची टीकाही केली जात आहे. राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्त्यांनीही बीडसंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यातच, मंत्री धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता असलेल्या कैलास फड याचा व्हिडिओ अंजली दमानिया यांनी शेअर केला होता. शस्त्रपूजा केल्यानंतर हवेत गोळीबार करण्यात आला होता, हा व्हिडिओ जुना असला तरी आता सोशल माध्यमातून व्हायरल होत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बीडमधील दहशत, बीडमधील गुंडागर्दी आणि बीडमधील बंदुकधारी तरुणाईचा प्रश्न जटील बनल्याचं यामुळे समोर आलं आहे. याच आधारावर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार परळी शहर पोलीस ठाण्यात कैलास फड याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे, शरद पवार गटाचे नेते माधव जाधव यांना विधानसभा निवडणुक मतदानादरम्यान याच कैलास फड याने मारहाण केली होती. ❊विधानसभा निवडणुकीतही यानेच केली होती मारहाण : विधानसभा निवडणुकीच्या मतदाना दिवशी कैलास फड याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते माधव जाधव यांना परळी मध्ये मारहाण केल्याचा व्हिडिओ विधानसभा निवडणुकांच्या काळात चांगलाच व्हायरल झाला होता. विशेष म्हणजे मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्राजवळ झालेल्या मारहाणीत कैलास फड याने शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील परळीच्या नेत्याला मारहाण केली होती. आता, बंदुकीतून गोळी झाडल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर तोही व्हिडिओ चर्चेत आला आहे.

पान १ वरून

कुणाचीही दादागिरी...

ठेवत या परिस्थितीला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित करत मुंडेंकडे बोट दाखवले होते. यावर मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी पालकमंत्री पदासंदर्भात प्रतिक्रिया येण्यासाठी संपर्क साधला असता योग्य वेळी आम्ही बोलू म्हणत बोलणे टाळले. ❊ बीडमध्ये कोणाचीही दादागिरी आम्ही चालू देणार नाही : तर बीड जिल्ह्यातील पालकमंत्री पदासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत बीडचा पालकमंत्री पद कोणी घ्यायच, यासंदर्भात मी, अजित दादा आणि शिंदे साहेब मिळून ठरवू अस म्हणत बीडमध्ये कोणाचीही दादागिरी आम्ही चालू देणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

पंकजा मुंडे मस्साजोग...

अहवालानंतर त्यांचे काही फोटो व्हायरल झालेत. ते पाहून अंगाचा थरकाप उडाला. धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांच्यात आर्थिक संबंध आहेत. वाल्मीकची बीडम्ध्ये दहशत असल्याचा दावा सर्वजण करत आहेत. मग ही कसली दगडाची लोकशाही आहे का?दुसरीकडे, अंजली दमानिया यांनी एका ट्विटद्वारे धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांच्यातील जमिनीच्या व्यवहाराचे सातबारेही समोर आणलेत. या सातबाऱ्यांत जगमित्र शुगर्सचे ६ सातबारे असून त्यात धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांची संयुक्त मालकी असल्याचे नमूद आहे. दमानिया यांनी शेअर केलेल्या सातबाऱ्यांमध्ये इतरही काही नावांसोबत धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांचे नाव दिसून येत आहे. अंजली दमानिया यासंबंधी आपल्या ट्विटमध्ये म्हणतात, धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन. हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र. जगमित्र शुगर्सचे ६ सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले. ३५५४ गुंठे जमीन (८८ एकर ३४ गुंठे) आहे.

मागील काळात बीडचे...

निवेदनापुढे बोलणारा मी कोण आहे. त्यांनी अतिशय पॉझिटीव्ह निवेदन कुणी केले नाही. एका दिवसात एसपी हलवला, गुन्हेगारांवर मोकोका लावणार असे सांगितले आहे. कायदा नावाची काही गोष्ट बीड जिल्ह्यात राहिली नाही. जी लोकं बीड जिल्ह्याचे पालक स्वत:ला म्हणून घेत होती ते गँग ऑफ सफेपूर का वासेपूर असे मी म्हटले. यांच्या पलिकडे जिल्ह्यात काय तयार झाले. सुरेश धस म्हणाले की, आता एसआयटी जाहीर होईल. एसपीनी रात्री ११ वाजता चार्ज घेतला. ते कडक वृत्तीचे आहेत तसेच पोलिस अधीक्षक आम्हाला हवे होते. पोलिस, सीआयडी हे सर्व आरोपींच्या मागे आहेत. त्यांना लवकरच अटक होईल, विष्णू चाटेने स्वत:ला पोलिसांच्या ताब्यात दिले. आता त्यांच्या मेन 'आका' हे देखील ३०२ चे सूत्रधार आहेत असे मला वाटत आहे. सुरेश धस म्हणाले की, परळी तालुक्यात अराजकता काय हे जाऊन बघातले पाहिजे. तेथील उद्योजकांकडे कोणतीही एजन्सी राहिली नाही. आता हे 'आका' बिनभाड्याच्या खोलीत गेले पाहिजे.

कोणाचा पण बाप...

तपास हातात घेतला तर मग सरकारला कळेल? अशा शब्दात त्यांनी सरकारलाही इशारा दिला. संतोष भैया देशमुखचं मृत्यूप्रकरण कोणाचा बाप आला तरी मी दबू देणार नाही. त्यासाठी, २८ तारखेच्या मोर्चात सगळ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांच्याकडून करण्यात आलं आहे. ❊ राहुल गांधींकडे डिझेलला पैसे नसतील : दरम्यान, परभणी दौऱ्यावर आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली नाही? यासंदर्भात प्रश्न विचारला असता जरांगे पाटील यांनी राहुल गांधींवर उपहासात्मक टीका केली. त्यांना रस्त्यात येताना गाडी लागली नसेल, त्यांच्याकडे डिझेलला पैसे नसतील, गरीब माणूस आहे म्हणून आला नसेल, असे जरांगे पाटील म्हणाले. तसेच, महायुती किंवा महाविकास आघाडी असू द्या यांचा एकदा भागलं की त्यांना गोरगरिबाचं देणं-घेणं राहत नाही. बीड जिल्ह्यात ज्यांच्या ज्यांच्यावरती अन्याय झाला आहे, त्यांनी समोर येऊन एसपींना सांगितले पाहिजे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केलंय. ❊ परभणीतील सूर्यवंशी कुटुंबीयांची देखील भेट घेणार : दरम्यान, मराठा आंदोलक व उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुढील आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. २५ जानेवारीला आंतरवाली मधील सामूहीक उपोषणासाठी राज्यभरातील गावागावातील मराठा समाज बैठक घेत आहे. तसेच, उद्या परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या घरी कुटुंबाची भेट घेणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

लाडक्या बहिणींना...

महिलांचा अंदाजित आकडा आणि रजिस्ट्रेशनची संख्या लक्षात घेऊन रजिस्ट्रेशन चालू करायचे की नाही, याचा निर्णय घेतला जाईल. ज्या ठिकाणी आम्हाला तक्रार प्राप्त झाल्या की आम्ही अर्जांची पडताळणी करू. पण सरसकट अर्जांची पडताळणी करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही. तसेच लाडकी बहीण योजनेच्या निकषांत बदल करण्यात आलेला नाही.

भुजबळांना डावलून...

त्यावेळी उपमुख्यमंत्रिपदासाठी अजित पवार इच्छुक होते. पण उपमुख्यमंत्रिपदी छगन भुजबळ यांची वर्णी लागली. पक्षाच्या नेतृत्त्वानं तो निर्णय घेतला. त्यावेळी याबद्दल प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांच्याशी चर्चा करण्यात आली होती. सर्वानुमते भुजबळ यांची निवड झाली होती. पण त्यावेळी अजित पवार नाराज झाले होते. तुम्ही मला का संधी देत नाही, अशी विचारण करत त्यांनी नाराजी उघड बोलून दाखवली होती. पण त्यांची नाराजी पक्षश्रेष्ठींनी दूर केली,' असा घटनाक्रम लांडेंनी सांगितला. 'आदर्श घोटाळा प्रकरणात अशोक चव्हाण यांना राजीनामा द्यावा लागला. मग पुढे भुजबळ यांनाही उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. ते देत नव्हते. पण त्यांना पायउतार व्हावं लागलं. तेव्हा अजित पवार उपमुख्यमंत्री व्हावेत अशी बहुतांश आमदारांची इच्छा होती. त्यासाठी आम्ही आमदारांची मोट बांधली,' असं लांडे यांनी सांगितलं. 'अजितदादा उपमुख्यमंत्री व्हावेत यासाठी आम्ही आमदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्यास सुरुवात केली. त्यावेळी उपमुख्यमंत्रिपदासाठी चार जण इच्छुक होते. जयंत पाटील, आर. आर. पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, छगन भुजबळ स्पर्धेत होते. आपल्याला उपमुख्यमंत्रिपद केलं जाईल का, असा प्रश्न त्यावेळी अजित पवारांना पडला होता. अजित पवारांच्या पाठिंब्यासाठी मी त्यावेळी आमदारांच्या सह्या घेतल्या होत्या. काम करणारा, आपल्या आमदारांना ताकद देणारा नेता उपमुख्यमंत्री हवा, अशी आमची भूमिका होती,' अशा शब्दांत लांडे यांनी जुना किस्सा सांगितला. 'आम्ही स्वाक्षरी मोहीम राबवली. बहुतांश आमदारांनी दादांच्या समर्थनार्थ सह्या दिल्या. जवळपास ९० टक्के आमदार दादांच्या पाठिशी उभे राहिले होते. त्यानंतर अजित पवार उपमुख्यमंत्री झाले,' असं लांडे म्हणाले. तेव्हापासून अजित पवार सहावेळा उपमुख्यमंत्री झाले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

थोडक्यात

२७-२८ डिसेंबर दरम्यान राज्यात मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता

शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवून नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

कालपासून राज्यातील विविध भागांमध्ये काही प्रमाणात आभाळी हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील तुरळक भाग; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी; आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे), आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या भागातील शेतकऱ्यांनी कृषी सल्ला आणि हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल राज्यपालांना शोक

मुंबई । प्रतिनिधी

ज्येष्ठ चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक पद्मभूषण श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. देशातील निवडक विचारवंत चित्रपट निर्मात्यांच्या यादीत श्री श्याम बेनेगल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. समांतर चित्रपटातील आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाद्वारे त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर आपली अमिट छाप सोडली. अंकुर, निशांत आणि मंथन यांसारख्या उत्कृष्ट कलाकृतींच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक वास्तवाचे चित्रण मांडण्याचे धैर्य दाखवले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रतिभावंत कलाकार जगासमोर आले. 'भारत एक खोज' या ऐतिहासिक दूरदर्शन मालिकेच्या माध्यमातून त्यांनी लाखो प्रेक्षकांना भारताच्या गौरवशाली इतिहासाची नव्याने ओळख करून दिली. त्यांच्या निधनामुळे अनेक चित्रपट निर्मात्यांना प्रेरणादायक असणारा एक प्रतिभावंत निर्माता - दिग्दर्शक गमावला आहे. मी दिवंगत श्री श्याम बेनेगल यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांना आणि चाहत्यांना आपल्या शोक संवेदना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी नाताळ निमित्त दिल्या शुभेच्छा

मुंबई । प्रतिनिधी

नाताळचा सण भगवान येशू ख्रिस्तांच्या प्रेमळ, संयमी, क्षमाशील व धीरोदात्त जीवनाचे स्मरण देतो. हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समाधान व संपन्नता घेवून येवो, या सदिच्छेसह सर्वांना नाताळ तसेच नववर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

नवविकास मंडळाच्या जवाहर आणि महात्मा फुले विद्यालयाकडून माहिती अधिकारात माहिती देण्यास टाळाटाळ

माहिती लपवताय म्हणजे; काही तरी दडलंय

माजलगाव । प्रतिनिधी

नवविकास मंडळाच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयात सामाजिक कार्यकर्ते मुंजाराम गाडेकर यांनी माहिती अधिकारात विधलयातील विविध बाबतीत माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता परंतु माहिती देण्यास तेथील जनमाहिती अधिकारी,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केली असून पुढील अपील दाखल करण्यासाठी माहिती देखील सांगितली नसल्याने नक्कीच या नवविकास मंडळाच्या शाळेत काहीतरी घोटाळा असून त्यामुळेच माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याने त्याविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा गाडेकर यांनी दिला आहे.

नवविकास मंडळ माजलगाव या संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय असे अनुदानित विद्यालय महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालय माजलगाव या ठिकाणी असून या शाळेतील गैर कारभार चव्हाट्यावर आणण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते मुंजाराम गाडेकर यांनी माहिती अधिकारात शाळेतील विविध मुद्यांची माहिती मागवली होती सदरील दोन्ही शाळेने मागितलेल्या माहिती अधिकारात माहिती देण्यास टाळाटाळ केली असून दिशाभूल करणारे उत्तर संबंधितांना देत आहेत तसेच प्रथम अपील स्वीकारण्यास देखील जवाहर विद्यालयाच्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने नकार दिला असून या प्रकरणी नक्कीच या संस्थेच्या विद्यालयात घोटाळा झाला असून माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करून मानसिक त्रास देण्याचे काम संबंधित माहिती अधिकाऱ्याकडून होत असल्याचा आरोप गाडेकर यांनी केला आहे.त्यामुळे सदरील घोटाळ्याची माहिती मिळावी यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला असून शाळेकडून जाणीवपूर्वक दिशाभूल करून शाळेचा गैरकारभार चव्हाट्यावर आणण्यासाठी आंदोलन छेडणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

▸ माहितीचा हेतू द्या शाळेकडून मागणी !

माहिती अधिकारात तुम्ही मागितलेल्या माहितीचा हेतू स्पष्ट करा अशी मागणी माहिती अधिकार दाखल करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला शाळेकडून विचारण्यात येत असून नक्कीच या ठिकाणी गैरकारभार सुरु असून तो दडपण्यासाठी माहिती देण्यास टाळाटाळ आणि अशी उडवाउडवीची उत्तरे उलट मागण्यात येत आहेत.

▸ शाळेमध्ये नाहीत माहिती अधिकाराचे फलक

नागरिकांना माहिती मिळावी यासाठी माहिती अधिकाराचे फलक शाळेच्या दर्शनी भागावर लावण्यात यावे अश्या सूचना वरिष्ठ कार्यालयातून कार्यशाळा घेऊन देण्यात आल्या आहेत तरी देखील या संस्थेच्या या दोन्ही विद्यालयात माहिती अधिकाराचे फलक लावण्यात आला नाही

मराठी पत्रकार परिषद विभागीय सचिवांच्या नियुक्तया जाहीर

संभाजीनगर विभागाच्या सचिव पदी रवी उबाळे

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या कोअर कमिटीच्या काल पुण्यात झालेल्या बैठकीत परिषदेच्या विभागीय सचिवांच्या नियुक्तयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

बीड येथील रवी उबाळे यांची संभाजीनगर विभागीय सचिवपदी निवड झाल्याबद्दल राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू घरत, संतोष सुतार, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख संजय हंगे आदींनी सत्कार केला.

विभागीय सचिवांच्या नियुक्तया करताना तरूणांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.एस.एम.देशमुख

बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

बैठकीस विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, मावळते विभागीय सचिव गणेश मोकाशी उपस्थित होते.. प्रारंभी पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले आणि टीमने परिषदेच्या पदाधिकारयांचे स्वागत केले.

मराठी पत्रकार परिषदेच्या संघटनात्मक रचनेत विभागीय सचिवांना विशेष महत्व आहे. आपल्या विभागात संघटनेचं काम वाढविणयाबरोबरच विभागातील जिल्हे, तालुका पत्रकार संघांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्याचं काम ही व्यवस्था करते.परिषदेच्या उपक्रमांची आपल्या विभागात अंमलबजावणी करण्याचं काम विभागीय सचिव पार पाडतात. थोडक्यात विभागीय सचिव हे परिषदेचे कान व डोळे म्हणून कार्यरत असतात.

नवे विभागीय सचिव पुढील प्रमाणे- १)मुंबई विभाग : दीपक कैतके, मुंबई फेरनियुक्ती २) पुणे विभाग : पी . पी. कुळकर्णी, सोलापूर ३)संभाजीनगर विभाग : रवी उबाळे, बीड ४) नागपूर विभाग : प्रदीप घुमडवार, नागपूर ५) अमरावती विभाग : शिखरचंद हुकूमचंद बागरेचा, वाशिम ६) कोकण विभाग : मनोज खांबे, महाड ७) लातूर विभाग : सचिन शिवशेट्टे उदगीर, फेरनियुक्ती ८) नाशिक विभाग : अमोल खरे, मनमाड ९) कोल्हापूर विभाग :चंद्रकांत क्षीरसागर, सांगली. एस.एम.देशमुख यांनी सर्व नवनियुक्त विभागीय सचिवांचे अभिनंदन केलं आहे.

पोलीस कर्मचाऱ्याला बुटाने मारून आरोपी फरार, गुन्हा दाखल

उदगीर । प्रतिनिधी

उदगीर तालुक्यातील वाढवणा पोलीस स्टेशन हद्दीतील नांदेड - बिदर रोडवर वाढवणा पोलीस स्टेशनचे कर्मचारी इकराम बशीरसाब उजेडे हे वाढवणा पोलीस स्टेशन हद्दीतील उदगीर - नांदेड रोडवर भगवान सिंग बयास यांच्या शेताजवळ एम व्ही ऍक्ट च्या केसेस करत असताना, शासकीय कामात अडथळा आणत आरोपीतांनी आमच्या बोलेरो पिकप (एम एच २४ ए बी ८०९७) या गाडीवर पाचशे रुपयांचा फाईन का मारला? म्हणून मनात राग धरून फिर्यादीस शिवीगाळ करून बुटाने मारहाण केली, आणि गाडी जर अडवला तर गाडी अंगावर घालून जीवे मारतो. अशी धमकी देऊन गाडी घेऊन पळून गेले. फिर्यादीस बळाचा वापर करून शासकीय काम करण्यापासून परावर्त केले. अशा पद्धतीची फिर्याद इकराम उजेडे यांनी दिल्यामुळे आरोपी राजेंद्र नागोराव साखरे (वय ५५ वर्ष रा. कुमदाळ), राहुल विनायक बिरादार (वय ३५ वर्ष रा. करखेली), अमोल विजयकुमार बिरादार (वय ३० वर्ष रा. करखेली), मजलस विनायक बिरादार (वय ५५ वर्ष रा. करखेली) यांच्याविरुद्ध गु.र. न. ३११ /२४ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एम के गायकवाड हे करत आहेत.

हवेत गोळीबार करणाऱ्या कैलास फडवर परळीत गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

परवानाधारक रिव्हॉल्वरमधून हवेत गोळीबार केल्याप्रकरणी कैलास फड ज्ञरळश्ररी हिरव यांच्या विरोधात परळी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर हवेत गोळीबार केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याची दखल जिल्हा पोलीस अधीक्षकांनी घेत परळी शहर पोलिसांना कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस हेड कॉन्स्टेबल विष्णू फड यांच्या फिर्यादीवरून कैलास फड यांच्या विरोधात कलम ५/२७, ३० आर्म्स ऍक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला. दरम्यान शहरात कोणाकडे अवैध शस्त्र असतील तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी देण्याचे आवाहन पो.नि.नाचन यांनी केले आहे. शिवसेनेचे बीड येथील जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी फेसबूक अकाऊंटवरून हा व्हिडिओ शेअर केल्यानंतर तो प्रचंड व्हायरल झाला होता. दिपावलीत शस्त्रपुजन करताना हा गोळीबार केल्याचे सांगितले जात असले तरी आता तपासात अनेक बाबी उघड होतील. गेल्या अनेक वर्षांपासून बीडमधील गुंडगिरी आणि तरुणाईचा प्रश्न खूपच जटील झाला आहे. विधानसभा निवडणुकीच्या मतदाना दिवशी कैलास फड याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते ॲड.माधव जाधव यांना परळीमध्ये मारहाण केल्याचा व्हिडिओ मतदानादिवशी व्हायरल झाला होता. आता, बंदुकीतून गोळी झाडल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर तोही व्हिडिओ चर्चेत आला आहे.

बीड : नुतन पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना शुभेच्छा देताना प्रसंगी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारुर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के, जनसामान्याचा विकासनामाचे संपादक बालासाहेब फपाळ, सामाजिक कार्यकर्ते सोमेश्वर सोनटक्के, वाल्मीक पाईक आनत राऊत

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५५/२०२४

शारदाबाई व ईतर विरूध्द निरंक

(मार्फत ॲड. आर. डी. भांबरे गेवराई)

ज्याअर्थी **मयत नामे सुभाष गुणाजी शिंदे हे दिनांक १०/०९/२०१० रोजी मौजे लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. **अर्जदार क्रं. १. शारदाबाई भ्र. सुभाष शिंदे वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड अर्जदार क्रं. २. महेश पि. सुभाष शिंदे वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मयत नामे सुभाष गुणाजी शिंदे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/१२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०१/२०२५

आदेशावरून.

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

(स्वाक्षरीत)
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

के.एस.पी. विद्यालय येथील विद्यार्थ्यांची मोरदरा व पंचायत समिती बीड येथे क्षेत्र भेट उत्साहात

बीड । प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील इयत्ता ३ री ते ६ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोरदरा येथील पर्यटन स्थळी घेऊन जाण्यात आले. विद्यार्थ्यांना परिसर अभ्यासचे ज्ञान प्रत्यक्षात व्हावे या उद्देशाने मुलांना बीड येथील पालीच्या घाटामध्ये असलेल्या मोरदरा हे पर्यटन स्थळी घेऊन जाण्यात आले. त्या ठिकाणी श्री महादेव मंदीर, डोंगर, विविध वस्तपती, प्राणी, पक्षी, गोशाळा, या बदल प्रत्यक्ष पहाणी करुन माहीती देण्यात आली. मुलांनी वन भोजन करुन क्षेत्रभेटीचा खुप आनंद घेतला. तसेच दि.२३.१२.२०२४ रोजी इयत्ता ७ वी ते ८ वी मधील मुलांना नागरिकशास्त्र विषयातील विविध संकल्पना आणखी सोप्या व्हावेत या हेतुने मुलांना बीड येथील पंचायत समिती बीड येथे मुलांना प्रत्येक्षात कृषि विभाग, लेखा विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण विभाग, अशा सर्व विभागाची माहीती देण्यात आली. यावेळी पंचायत समितीतील गटविकास अधिकारी श्री. अनुरुद्र सानप सर, गट शिक्षणाधिकारी श्री भगवान सोनवने सर, माटे सर यांनी पंचायत समितील सर्व कामकाजाविषयी मुलांना खुप मोलाचे मार्गदर्शक केले. सर्व मुले खुप आनंदी होती. या क्षेत्रभेटीस श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी दोन्ही क्षेत्रभेटी उत्साहात संपन्न केल्या.

महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ साठी ऑनलाईन प्रस्ताव पाठवाण्याचे आवाहन

जानेवारी २०२५ मध्ये विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे पार पडणार भव्य वितरण सोहळा

पुणे । प्रतिनिधी

विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यक्तींना दैनिक शिवजागर, विश्वनाथ फाउंडेशन व इन्फोडॅड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक ॲड. शंकर चव्हाण यांनी माध्यमांशी बोलतांना दिली आहे. त्यामध्ये सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक,

कला, पत्रकारिता, गायक, युवा, राजकीय, कृषि, उद्योग, आरोग्य, क्रीडा, बँक, कंपनी, आदर्श माता, शिक्षक, कवी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शाळा, महाविद्यालय, व्यवस्थापन, प्रेरणादायी वक्ता, फोटोग्राफर इत्यादी क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल असंही ते म्हणाले. महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ चे उद्दिष्ट हे महाराष्ट्र राज्यातील ज्यांच्या योगदानामुळे राज्य आणि समाज समृद्ध झाला आहे व ज्यामुळे समृद्धी आणि प्रगती झाली आहे. अशा व्यक्तींच्या उल्लेखनीय कामगिरी, योगदान आणि प्रेरणादायी जीवनाचा गौरव करणे असा आहे असं संबंधीत संस्था पदाधिकारी यांनी माहिती दिली. पुरस्काराचे स्वरूप हे सन्मानचिन्ह, मानपत्र, फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असणार आहे. तसेच भव्य पुरस्कार वितरण सोहळा जानेवारी २०२५ पुणे येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन नामांकनासाठी व अधिक माहितीसाठी ९७६९७५९७३७ या क्रमांकावर संपर्क करावा व ऑनलाईन अर्जासाठी https://shivjagar.com/award या लिंकचा वापर करुन अर्ज करावा असे आवाहन संयोजक यांच्या वतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी घेतली मस्साजोग येथील देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने देशमुख कुटुंबास आर्थिक मदत

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली. या हत्येमधील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे. याबाबत विश्वास देण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा संदेश देण्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. शिवसेनेच्या वतीने देशमुख कुटूंबीयांना आर्थिक मदतही देण्यात आली. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांची भेट घेतली. उदय सामंत यांनी गावकऱ्यांसोबत देखील चर्चा करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. या प्रकरणी एस आय टी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले.

आता नवनिर्वाचित महायुतीच्या मंत्रिमंडळातील सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांशी भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकांशी बोललो तेव्हा मलाही भीती वाटल्याची कबुली मंत्री शिरसाट यांनी दिली. परंतु या हत्याकांडामध्ये आरोपी अटक केल्यानंतर गुप्तता पाळली जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला राजकारणामध्ये आणू नका. विरोधक आणि सत्ताधारी काय म्हणतात, त्यामध्ये रस नाही. आमची भूमिका स्पष्ट आहे. यात देशमुख यांच्या हत्येमध्ये ज्यांचा हात असेल तो कोणीही असो, कोणत्याही पक्षाचा असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे' असेही यावेळी मंत्री संजय शिरसाट म्हणाले आहेत.

•महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने आर्थिक मदत

दरम्यान, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना यावेळी आर्थिक मदत देण्यात आली. आणि पुढील घराची जबाबदारी सुद्धा घेतली. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत व सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, अविनाश जाधव, सुमित कोळपे, अजय सूरवसे, सुरज चुंगडे यांच्या हस्ते संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी, भाऊ धनंजय यांच्याकडे ही मदत सुपूर्द करण्यात आली.

परळी तालुक्यातील मुकादमाने ऊसतोड मजुराचा दगडाने ठेचून केला खून; कर्नाटकात घडली घटना

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील अस्वलंबा येथील ऊसतोड मजूर विकास बाळासाहेब जोगदंड (वय २८) हा झोपेत असताना त्यांच्याच गावचा मुकादम श्रीकृष्ण विठ्ठल ढाकणे (वय ४७) याने डोक्यात दगड घालून त्याचा खून केल्याची घटना कर्नाटक राज्यात घडली.

घटप्रभा पोलिस व घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार मुकादम श्रीकृष्ण ढाकणे हा आजारी असल्याने त्यास विकास जोगदंड याने उपचारासाठी दवाखान्यात आणले होते. दवाखान्यात दाखल करून जोगदंड दवाखान्याबाहेर उभारण्यात आलेल्या जगद्गुरू गुरु सिद्धेश्वर मूर्ती जवळ रात्री साडेअकराच्या सुमारास झोपला होता. रात्री श्रीकृष्ण ढाकणे हा दवाखान्या बाहेर आला आणि काही कळायच्या आत विकास जोगदंडच्या डोक्यात चाळीस किलो पेक्षा मोठा दगड घातला. त्यानंतर विकासच्या छातीवर बसून दगडाने तोंड, डोके ठेचू लागला. हे पाहून दवाखान्याच्या सुरक्षा रक्षकाने धाव घेत ढाकणे याला पकडले आणि घटप्रभा पोलिसांना माहिती दिली. ढाकणे याला पोलिसांच्या ताब्यात दिले. मृताचे वडील बालासाहेब मारुती जोगदंड यांनी घटप्रभा पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिस निरीक्षक एच. डी. मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक एस. आर. कणवी अधिक तपास करीत आहेत.

एका हातात शस्त्र आणि दुसऱ्या हातात शास्त्र असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होत्या : तुकाराम येवले

•माजलगावात अहिल्यादेवींच्या जीवनावरील चित्रप्रदर्शनी

माजलगाव । प्रतिनिधी

अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य अखंड भारतभर होते. एका हातात शत्र आणि एका हातात शास्त्र असणाऱ्या अहिल्यादेवी होत्या. भारतीय विचारात राष्ट्र घडणीचे कार्य करणाऱ्या आदर्श राष्ट्रमाता होत्या असे प्रतिपादन तुकाराम येवले यांनी केले.

सिद्धेश्वर महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी निमित्ताने त्यांच्या जीवनावरील चित्रप्रदर्शनी कार्यक्रमात उदघाटक म्हणून बोलत होते. व्यासपीठावर सिद्धेश्वर संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, अभय कोकड, प्रा.लक्षीमिकांत सोन्नर यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. होन्ना यांनी मानले. उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, प्रा.अंकुश साबळे उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील चित्रप्रदर्शनी पाहण्यासाठी अनेक शाळातील विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

दत्तधाम मधील श्रीदत्त मूर्तीची उद्या प्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी

शहरातील फुलाईनगर भागात असलेल्या दत्तधाम येथील मंदिराचे काम सुरू आहे,सध्या मुख्य गाभाऱ्याचे काम पूर्ण झाले असून परिसरातील भाविकांच्या सहकार्याने हे काम सुरू आहे,उद्या दि २५ रोजी श्रीदत्त मूर्तीची भव्य शोभायात्रा निघणार असून दि २६ रोजी विधिवत प्राणप्रतिष्ठा होणार आहे तर दि २७ रोजी महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे तिन्ही दिवशी भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

बीड शहरातील फुलाई नगर गुरुप्रसाद कॉलनी एकता नगर व्यंकटेश कॉलनी येथील भाविक भक्तांच्या सहकार्याने भव्य आणि दिव्य श्रीदत्त मंदिराचे काम सुरू असून सध्या गाभाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे अत्यंत सुंदर आणि मनमोहक अशी दत्तमूर्ती देखील आणण्यात आली आहे दिनांक २५ रोजी दुपारी चार वाजता भगवान दत्तात्रयाच्या मूर्तीची शोभायात्रा

निघणार असून दिनांक २६ गुरुवार रोजी सकाळी आठ वाजता पत्रकार प्रशांत सुलाखे,उद्योजक अतुल संघांनी,शामसेठ क्षीरसागर, संदीप कुलकर्णी, योगेश खडके या यजमानाच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे,या सोहळ्यासाठी श्रीसमर्थ संस्थान साडे भोगलगाव येथील सद्गुरू सुरेश महाराज रामदासी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे,सायंकाळी चार वाजता प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे तर रात्री ८ ते १० या वेळेत नादब्रह्मच्या स्थानिक कलाकारांचा गुरुवार पंचपदी आणि भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे दिनांक २७ रोजी याच भागात असलेल्या संदीप कुलकर्णी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या तीनही दिवसात दत्त भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री दत्त मंदिर देवस्थान दत्तधाम बीडच्या वतीने करण्यात आले आहे सध्या मंदिराचे काम सुरू असून भाविक भक्तांनी सरळ हाताने मदत करावी असे देखील आवाहन करण्यात आले आहे

त्रिमूर्ती सरकारने महाराष्ट्रातील सर्व निवडणुका मत पत्रिकेवर घेण्यात याव्यात: वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य मतदार संघातील ग्रामपंचायत ते नगरपंचायत नगरपालिका महानगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषदेच्या निवडणूका बॅलेट पेपरवर घेण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मागणी मुख्य सचिवामार्फत माननीय राष्ट्रपती भारत सरकार यांच्याकडे

निवेदनाद्वारे केली. तात्काळ राज्यातील न्यायप्रविष्ट ओबीसीचा आरक्षणाचा मुद्दा त्वरित सोडवा. शेतकऱ्यांना पिक विमा व अतिवृष्टीचे पैसे तात्काळ खात्यात वर्ग करण्यात यावेत. शेतीमालाला किमान आधारित भाव देण्याची मागणी करण्यात आली असून शेतीवरील जीएसटी कर रद्द करण्यात यावा .बीड जिल्ह्यातील गुंडागर्दीला तात्काळ नियमानुसार कारवाई करून भयमुक्त जिल्हा करण्याचे आवाहन काँग्रेसचे नेते वसंत मुंडे नरेश हलगे राजेंद्र राजशिर्के रवींद्र रणदिवे शरद काळे शेख अल्ताफ लहुदास तांदळे इत्यादींनी केले.

नेकनूर येथे राज्य महामार्गावर गतिरोधक नसल्याने नागरिकांचा जीव धोक्यात

तातडीने गतिरोधक न उभारल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करू : पत्रकार तथा ग्रा.पं. सदस्य अशोक शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर गावातून जाणाऱ्या अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. अनेक दिवसापासून नेकनुर येथे राज्य महामार्गावर गतिरोधक बसवण्याची मागणी केली गेली

आहे. या महामार्गाच्या एका बाजुने जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक उर्दू व मराठी माध्यमिक शाळा, प्राथमिक जिल्हा परिषद उर्दू शाळा तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा आहे. या शाळेत जाण्यासाठी राज्य महामार्ग ओलांडून जावे लागत आहे. तर या मार्गावर सरकारी दवाखाना, बसस्थानक परिसरात वाहनांची मोठी वर्दळ असल्याने या ठिकाणी गतीरोधक बसवण्याची मागणी अनेक दिवसांपासून आहे. तरी येथील राज्य महामार्गावर गतिरोधक न बसवल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे यांनी दिला आहे.

रंजना भावसार जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने सन्मानित

वडवणी । प्रतिनिधी

नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महाराष्ट्र राज्य महिला परिषदेच्या राज्य सचिव रंजना भावसार यांना वर्षे २०२४ साठी जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन २ चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्रात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन चे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या वतीने राज्य भर विविध उपक्रम राबविले जातात या मध्ये रक्तदान शिबीर ,मुल दत्तक घेणे, वृक्ष लागवड ,गरजुना ताडपत्री वाटप , कॅन्सर पेशंट साठी उपचार , जयपूर फुट्स,सामुहिक विवाह सोहळा गरीब विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत आदिंचा समावेश आहे . रंजना भावसार यांना जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन दोन चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र, मैत्रीण, नातेवाईक, समाज बांधव तसेच सर्व स्तरातून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

केतुरा गावामध्ये दावल मालिका यात्रेमध्ये जंगी कुस्त्याचा फड संपन्न

गाव व्यतिरिक्त वर्गणीतून पैलवानांना शेवटचे ६५ हजाराचे बक्षीस

वडवणी । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे केतुरा गावची यात्रा झाली उत्साहात साजरी महिला मल्लांनी ही गाजवला आखाडा गावची जत्रा ही गावच्या प्रत्येक व्यक्तीसाठी उत्सुकतेचा व आनंदाचा विषय असून ; सामाजिक बांधिलकी जपणारे आपले गाव , दावल मालिक यात्रेत दर वर्षी मग्न होऊन एकीने सहभागी होते . संदल ची मिरवणुक झाली की , दुसऱ्या दिवशी सुरू होतो कुस्त्यांचा माहोल . गावात वाजत-गाजत मिरवणुक निघते देवाच्या चरणी नारळ फोडून उत्साहात सुरुवात होते . संपूर्ण गाव जमा होतो . सालाबादप्रमाणे या ही वर्षी कुस्त्याच्या आखाड्यामधे, पंचक्रोशीतील आणि महाराष्ट्रातील नामवंत मल्लाची उपस्थिती कार्यक्रमात होती . विशेष म्हणजे 'केतुरा' गावच्या इतिहासातील पहिलीच यात्रा अशी झाली , की त्यामध्ये संभाजीनगर आणि राजस्थान मधील महिला मल्लांनी आपला मैदानी खेळ दाखवला दरवर्षी प्रमाणे गावकऱ्यांनी स्वखुशीने जमा

केलेल्या बक्षीसा व्यतिरिक्त केतुरा गावचे आदर्श सरपंच परमेश्वर (नाना) तळेकर यांच्या हस्ते स्वः खर्चातून ६५ हजार रुपयांचे मल्लांना बक्षीस वितरण करण्यात आले . केतुरा गावचे सरपंच परमेश्वर नाना तळेकर उपसरपंच वसंत शिरसाट चेअरमन रामनाथ रहाडे, व्हाईस चेअरमन बाबासाहेब सिरसट, गजेंद्र बेद्रे, महादेव तळेकर, नवनाथ वांढरे, शिवाजी ढगे, श्रीराम शिरसाट, नारायण शिंदे, दिलीप वांढरे, बाबासाहेब शिंदे, रामदास वांढरे, सदाशिव घाडगे सर, उत्तमराव राहडे सर,जनार्दन तळेकर राधाकिसन माने, घाडगे नंदकुमार घार्गे, कल्याण राहाडे, ग्रामपंचायत सदस्य श्रीधर गायकवाड व सोमीनाथ वांढरे सुदर्शन घाडगे, विलास भुसारी, अशोक शिंदे एकनाथ शिरसाट अश्रुबा खेडकर भिवसन निळकंठ इलिंद ससाने व सर्व गावातील तरुण मंडळ यांनी जंगी कुस्त्या चा कार्यक्रम आनंदात पार पडला. माणसा ची शरीर संपत्ती हीच खरी संपत्ती आहे शरीराला मेहनत व व्यायाम याची सवय लागणे गरजेचे आहे यामुळे आरोग्य चांगले राहते व निरोगी राहते तरुणांनी या दिशेकडे वाटचाल करावी व व्यायामाचा फायदा पोलीस भरती असो आर्मी भरती असो यामध्ये अतिशय फायदा होतो बीड ग्रामीणचे पोलीस कर्मचारी दुबाले साहेब व सानप साहेब यांनी महत्त्वाची जिम्मेदारी निभावली व त्यातून पैलवान विक्रमराव काशीद यांनी वस्तादचं काम निभावल शेवटची कुस्ती बाळु पैलवान व शकील पैलवान यांची झाली.